माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२२९/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मंदीप मारोती गोरडवार, मु. पुलखल, पो. कनेरी, ता.जि. गडचिरोली | नायब तहसिलदार, (आपत्ती व्यवस्थापन), जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली | तहसिलदार, (आपत्ती व्यवस्थापन), जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली |

**सुनावणी दिनांक :- १७.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २५.०४.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अपुर्ण देण्यात आलेली आहे व संबंधित माहिती देवून अपिलार्थीची दिशाभूल केलेली आहे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०५.०१.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०१.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१९ ते आजपावेतो

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) केंद्र शासन, महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त लसीकरण बंधनकारक करण्याविषयी लेखी आदेश, शासन परिपत्रक संबंधित दस्ताऐवजाच्या सत्यप्रती २) कोरोना लसीकरणामुळे सामान्य नागरिक, लहान मुलाना शारीरिक, मानसिक हानी पोहचणार नाही. अशा प्रकारचे 'हमीपत्र' केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन व कोरोना लसीकरण कंपनीकडून जिल्हाधिकारी कार्यालयास

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

प्राप्त झाले असल्यास त्या हमीपत्राची सत्यप्रत ३) कोरोना लसीकरणावर केलेल्या खर्चा संबंधित संपुर्ण दस्ताऐवजाच्या सत्यप्रती.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजी सदर माहिती अर्ज कलम ६(३) नुसार १) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय गडचिरोली २) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचेकडे हस्तांतरीत केले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जि.प. गडचिरोली यांनी दिनांक ०१.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ बाबत कोविड लसीकरण बंधनकारक असल्याबाबत या कार्यालयाला लेखी आदेश व शासन परिपत्रक प्राप्त नाही, मुद्दा क्र. २ बाबत अशा प्रकारचे कोणतेही हमीपत्र या कार्यालयाला प्राप्त नाही. तसेच मुद्दा क्र. ३ बाबत खर्चाचा तपशिल अपिलार्थीस पुरविण्यात येत आहे, असे कळविण्यात आले आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली यांनी दिनांक ०३.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ बाबत कोविड लसीकरण बंधनकारक असल्याबाबत या कार्यालयाला लेखी आदेश व शासन परिपत्रक प्राप्त नाही. मुद्दा क्र. २ बाबत अशा प्रकारचे कोणतेही हमीपत्र या कार्यालयाला प्राप्त नाही. तसेच मुद्दा क्र. ३ बाबत कोविड लसीकरण संबंधित निधी प्राप्त झाला नसल्याचे अपिलार्थीस सुचीत केले आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.०२.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०९.०२.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : विहीत मुदतीत माहिती दिलेली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून, अर्जदाराची प्रथम अपील ग्राहय ठरविण्यात येत आहे. सदरहु अपिलकर्ता यांना आवश्यक व उपलब्ध असलेली माहिती त्वरीत पुरविण्यात यावी, असे आदेश पारीत करण्यात आले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली, श्री. येरमे उपस्थित असून त्यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०५.०१.२०२२ रोजीचा माहिती अर्ज हा दिनांक १०.०१.२०२२ रोजी १) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय गडचिरोली २) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केले आहे. त्यानुसार आरोग्य विभाग, जि.प. गडचिरोली येथील जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.०२.२०२२ रोजी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली यांनी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी माहितीबाबत अवगत केले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०७.०३.२०२२ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जि.प.

गडचिरोली यांनी दिनांक ०८.०३.२०२२ रोजी अपिलार्थीस एकूण १९९ पृष्ठांची माहिती विनामुल्य पुरविली आहे.

६. निष्कर्ष –

१. अपिलार्थी यांनी व्दितीय अपील अर्जात अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्याचे नमूद केले आहे. परंतु आज सुनावणीत अपिलार्थी हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती अपुर्ण मिळाली याबाबतचा स्पष्ट बोध होऊ शकला नाही.

२. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढणे क्रमप्राप्त ठरत आहे.

**आदेश**

**वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**

**प्रत,**

१) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

जावक क्रमांक 783 दिनांक 14 FEB 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर